# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/03/2023 (गुरूवार) दुपार

---

## विनयभंग

**पो.स्टे. काटोल** :– दिनांक १५.०३.२०२३ चे १७.०० वा. ते १७.०५ वा. दरम्यान आरोपी नामे– शुभम प्रभाकर गुप्ता वय २३ वर्ष, रा. सहारा पार्क काटोल हा फिर्यादी/पिडीता हीचा पाठलाग करून फिर्यादीला म्हणाला की ''तु माझे सोबत फिरायला बाहेर चल मी तुझावर प्रेम करतो तु माझेवर प्रेम कर व माझी गलफ्रेन्ड बंन नाहीतर मी तुला जिवाने मारून टाकीन'' अशी धमकी दिली व जबरीने पकडुन डोक्याचे केस पकडुन फिर्यादीस ओढत फरफटत नेले व हातबुक्याने मारपिट करून रस्त्यावर खाली पाडले यातील आरोपी याने फिर्यादीस लज्जा वाटेल असे कृत्य करून फिर्यादीचा विनंयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(अ), ३५४(ड), ३२३, ५०४, ५०६ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा/१७३२ ज्योती सेवतकर मो. क्र. ९५५२५५६३४१ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा गुमथळा येथे दिनांक १४/०३/२०२३ चे २१.३० वा. ते १५/३/२०२३ चे ०१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मदन दुर्गा उईके, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र. ३ गुमथळा यांचे गोठयामधुन एक तपकीरी रंगाचा बकरा किंमती अंदाजे ५,०००/– रु काळया रंगाच्या दोन बकऱ्या किंमती अंदाजे १०,०००/– रु दोन पांढऱ्या रंगाच्या बकऱ्या किंमती अंदाजे १०,०००/– रु. एक तपकिरी रंगाची बकरी किंमती अंदाजे ५०००/– रु असा एकुण ३०,०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा. राउत ब नं ४७८. मो नं ८५५४९६७९४० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**